# महाराष्ट्र शासन

## जिल्हा परिषद, यवतमाळ– जाहिरात क्रमांक

## राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान

## तालुकास्तर स्तरावरील कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांची जाहिरात

(1.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र. रागापं-20183/प्र.क्र.140/योजना-4 दि.6/8/2014)

(२. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक/आरव्ही२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ २५/एप्रील/२०१६)

राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाची परिमाणकारकरित्या अंमलबजावणी करण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व कंत्राटी पध्दतीने जिल्हा स्तरावरील खालील पदांची भरती करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज दि.07/09/2016 ते दि.17/09/2016 या कालावधीत मागविण्यात येत आहेत. **भविष्यात या पदांवर शासनामध्ये कायम करण्याचा हक्क सांगता येणार नाही. या अटीवरच उमेदवाराने अर्ज भरावा.** पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

पद :- तालुका पेसा समन्वयक

| अ. क्र. | पदाचे नाव | नियुक्तीचा प्रकार | पदसंख्या | आरक्षण | मानधन | अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | तालुका पेसा समन्वयक | निव्वळ कंत्राटी | 4 | अज.1<br>भजक 1<br>अजा-1<br>इमाव-1 | प्रत्येकी रु. 20000/- पर्यंत दरमहा | शैक्षणिक अर्हता :-<br>1.खालील विषयातील पदव्युत्तर पदवी (सामाजिक कार्य / ग्रामीण विकास / समाजशास्त्र / लोक प्रशासन / PGD ग्रामीण विकास / आदिवासी विकास / मानववंशशास्त्र ) 2. संगणकाचे ज्ञान (MS-Office) असणे आवश्यक आहे. |
| | | | | | | अनुभव :- ग्रामीण विकास क्षेत्रातील / आदिवासी विकासाच्या निगडीत क्षेत्रातील किमान 2 वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. |

## अर्ज करण्याचा पत्ता व संपर्कासाठी माहिती

प्रति :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ

पत्ता :- पंचायत विभाग, जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, आर्णी रोड, यवतमाळ

दुरध्वनी क्रमांक :- 07232 – 245249

**कंत्राटी पदांसाठी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक :- 17/09/2016**

1) अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांकाच्या कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा, अपुर्ण स्वरुपातील माहिती भरलेल्या, ई-मेल द्वारे पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी www.yavatmal.nic.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. जाहिरातीमधील सुचना व माहितीचा काळजीपुर्वक अभ्यास करुन विहीत नमुन्यात पोस्टाने किंवा प्रत्यक्ष विहीत दिनांकापुर्वी आणि विहित नमुन्यातील अर्ज पंचायत विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ येथे द्यावा, इतरत्र दिलेला अर्ज स्विकारला जाणार नाही.

2) कंत्राटी पद भरती प्रक्रियेत कोणताही आणि केव्हाही बदल करण्याचा, पद संख्येत बदल करण्याचा अथवा भरती प्रक्रिया रदद करण्याचा संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ तथा अध्यक्ष, जिल्हास्तर निवड समिती, जि.प. यवतमाळ यांना राहतील.

3) सर्व पदांसाठी वयाची किमान व कमाल अट ही 18 वर्षे व कमाल 38 वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी 43 राहिल. वयाची किमान व कमाल मर्यादा ही अर्ज करावयाच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दि. / /2016 अखेर ग्राह्य धरण्यात येईल.

4) अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रत (झेरॉक्स प्रती) सत्यप्रती :-

1) शैक्षणिक पात्रतेसंदर्भात 10 वी /12 वी / पदवी / पदव्युत्तर पदवी
2) 10 वी /12 वी / पदवी / पदव्युत्तर गुणपत्रिका (मार्कलिस्ट)
3) वयाचा पुरावा
4) जातीचा दाखला / क्रिमीलेअर प्रमाणपत्र
5) अनुभवाचे प्रमाणपत्र
6) पुरस्कार / प्रशस्तीपत्र
7) इत्तर अनुषंगिक प्रमाणपत्र / कागदपत्रे
8) अनूभव हा शासकीय,शासन अधिकृत कार्यालय, महामंडळ, संविधान मान्य विदयापीठ, इतर शासनाच्या मान्यता असलेल्या अधिकृत संस्था मधूनच ग्राहय धरण्यात येईल.

5) वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या शासन निर्णयाचे अधिन राहून, आरक्षणानुसार पदांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

6) उपरोक्त पदांकरिता शासन निर्णयात नमुद प्रमाणे कौशल्य चाचणी तसेच मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमानुसार उमेदवारांची निवड केली जाईल.

7) उमेदवार सध्या किंवा पुर्वी कंत्राटी तत्वावर एखादया शासकीय विभागात कार्यरत असतांना त्यांना काढून टाकले असल्यास / कार्यरत असल्यास त्या संबंधीचा तपशिल व अनुभवाचा तपशिल स्वतंत्रपणे नमुद करणे आवश्यक आहे.

8) सदर पदासाठी परिक्षा शुल्क खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.200/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.100/- राहिल सदर परिक्षा राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्ष DD मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या नावाने जोडावे त्यावर उमेदवाराचे संपुर्ण नाव,प्रवर्ग व पदाचे नाव स्पष्टपणे नमुद करावे.

9) तालुका पेसा समन्वयक पदाला आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेसाठी ७०%, अतिरीक्त शैक्षणिक अर्हतेसाठी १०%, अनुभवासाठी १०% आणि १०% मुलाखतीसाठी वेटेज देण्यात येईल.

10) तालुका पेसा समन्वयक या पदासाठी कौशल्य चाचणीसाठी १ पदास १० उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल व त्यातुन १ पदास ५ उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड करून कौशल्य चाचणीत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांची मुळ गुणानुक्रम यादी आणि मुलाखतीमध्ये प्राप्त झालेल्या मार्काप्रमाणे अंतीम गुणानुक्रम निश्चित करुन पहिल्या क्रमांकाच्या उमेदवाराची अंतिम निवड करण्यात येईल .

11) अंतिम निवड यादी तयार करताना ज्या उमेदवारांना समान गुण मिळाल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांचे प्रथम उच्च शिक्षण व तदनंतर वयाने जेष्ठ असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

12) उमेदवारांची प्रतिक्षा यादी एकुण पद संख्येच्या २ पट करण्यात येईल. या प्रतिक्षा यादीची वैधता १ वर्षापर्यंत राहील. या कालवधीत निवड यादीतील उमेदवार हजर न झाल्यास किंवा हजर होवुन नोकरी सोडुन गेल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारास गुणानुक्रमे कंत्राटी तत्वावर नेमणुक देण्यात येईल.

(दीपक सिंगला)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ